**मे. कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना लि. अंकुशनगर, ता. अंबड, जि. जालना यांनी प्रस्तावित केलेल्या ३० किलो प्र.दि. ते ६० किलो प्र.दि. मळीवर आधारीत आसवणी या प्रस्तावित प्रकल्पाकरिता दिनांक १३/१२/२०१९ रोजी स. ११.०० वा. मे. कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना लि. (प्रस्तावित स्थळ), अंकुशनगर, ता. अंबड, जि. जालना येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणीचे इतिवृत्त :-**

मे. कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना लि. अंकुशनगर, ता. अंबड, जि. जालना, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या ३० किलो प्र.दि. ते ६० किलो प्र.दि. मळीवर आधारीत आसवणी या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पासाठी दिं. १३/१२/२०१९ रोजी स. ११.०० वा. मे. कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना लि. (प्रस्तावित स्थळ), अंकुशनगर, ता. अंबड, जि. जालना, महाराष्ट्र येथे पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्यात आली होती.

सदर जाहीर लोक सुनावणीस खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१) **श्रीमती. दिपाली मोतीयेळे,**
प्रभारी अप्पर जिल्हाधिकारी, जालना,
जि. जालना. — अध्यक्षा.

२) **श्री. राजेंद्र आ. राजपूत,**
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद. — सदस्य.

३) **डॉ. योगिनी अ.बाळंखे,**
उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, जालना. — समन्वयक.

जाहीर लोक सुनावणीस उपस्थित असलेले सदस्य आणि सार्वजनिक सहभागी यांची यादी येथे जोडली आहे. डॉ. योगिनी बाळंखे, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, जालना तथा पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समितीचे समन्वयक यांनी उपस्थितांचे स्वागत करून पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनाणी समितीचे अध्यक्षा यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसूनावणीची कार्यवाही सूरु केली. त्यांनी सांगितले की सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार चे अधिनियम क्र. एस.ओ.१५३३. दिं. १४ सष्टेंबर, २००६ व सूधारित अधिसूचना क्रं. ३०६७ (इ), दि. १/१२/२००९ यातील तरतुदी आणि प्रकल्पाचा सारांश स्पष्ट करुन प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांच्या पर्यावरण सल्लागार , मे. बिल्डींग एनव्हायरोमेंट इंडिया प्रा.लि., पूणे यांच्या मार्फत पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्यासाठी पर्यावरण आघात मूल्यांकन अहवाल साधीत सादर केलेला अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ते म.प्र.नि. मंडळाने दिं. १२/११/२०१९ रोजीच्या डेली टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी) व दैनिक

सकाळ (मराठी) या वर्तमानपत्रामध्ये नोटीस प्रसिध्द होईपर्यंत पर्यावरण मंजुरी घेण्यासाठी अवलंबविण्यात येणाऱ्या पध्दतीचे वर्णन केले. त्यांनी सांगीतले की, ३० किलो प्र.दि. ते ६० किलो प्र.दि. मळीवर आधारीत आसवणी प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्प सदर अधिसूचनेनूसार 'अ' वर्गात मोडतो. ज्यास भारत सरकार नवी दिल्ली यांची पर्यावरण विषयक मंजूरी लागते, म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोकसुनावणी घेणे आवश्यक आहे. त्यांनी पुढे सांगीतले की सदर अधिसूचनेनूसार प्रस्तावित प्रकल्प बाबतचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेतील कार्यकारी सारांश यांच्या प्रती संबंधीत ग्रामपंचायत कार्यालये जसे महाकाळा, शहागड, साष्टपिंपळगाव, वडिगोद्री इ. तसेच वेगवेगळी शासकीय कार्यालये जसे जिल्हाधिकारी कार्यालय, जालना, तहसिल कार्यालय अंबड, जिल्हा परिषद कार्यालय जालना, जिल्हा उद्योग केंद्र, जालना, मंत्रालय, मुंबई, म.प्र.नि. मंडळाचे जालना, औरंगाबाद व मुंबई येथील कार्यालये आणि सीपीसीबी कार्यालय, नागपूर या ठिकाणी लोकांच्या अभ्यासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या आणि सदर प्रकल्पाबाबत जर कुणाच्या काही सूचना, आक्षेप असतील तर ते त्यांनी वर्तमानपत्रामध्ये सदर प्रकल्पाबाबतची जाहीरात प्रकाशित झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावे असे लोकांना आवाहन ठेवण्यात आले होते, आणि त्या अनुषंगाने श्री. व्हि. सुनंदा रेडडी, तेलंगना यांच्या तर्फे उप प्रादेशिक कार्यालय, जालना येथे दिं. ०९/१२/२०१९ रोजी इ-मेल द्वारे एक सूचना प्राप्त झालेली आहे. त्यांनी सांगितले की जर कुणाला काही सूचना, आक्षेप इ. नोंदवायचे असतील तर ते आज येथे मौखिक अथवा लिखित स्वरूपात नोंदवू शकतात. प्रश्न हे फक्त पर्यावरणाशी संबधीतच विचारावेत अशी त्यांनी विनंती केली जेणेकरून प्रकल्प प्रवर्तक यांचे समाधानकारक स्पष्टीकरण करतील व त्यांची इतिवृत्तामध्ये नोंद घेतल्या जाईल आणि ते सदर जाहीर लोकसूनावणीचय व्हिडियो चित्रीकरणासहित पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली येथे पूढिल आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. त्यांनतर त्यानी सदर जाहीर लाकसूनावणी समितीच्या अध्यक्षा यांच्या परवानगीने प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

नंतर प्रकल्प सल्लागार श्री. अधिकराव येवले यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे पावर पॉइंट सादरीकरण ज्यामध्ये प्रकल्पाचा तपशिल, पर्यावरणीय प्रदूषण, योजना, उपकरणे, करण्यात येणा-या उपाययोजना इ. चा समावेश आहे ते सूरू केले आणि उप प्रादेशिक अधिकारी यांनी आधी सांगितल्याप्रमाणे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय यांनी जारी केलेल्या अधिसूचना दिं. १४/०९/२००६ (सूधारित) नूसार कोणत्याही औद्योगिक प्रकल्पास पर्यावरण विषयक मंजूरी घेणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की प्राकृतीक व जैवपर्यावरणची माहिती करन घेणे व प्रकल्पामूळे होणा-या परिणामांना नियंत्रित करण्यासाठी आवश्यक उपाय योजना प्रारंभीच्या काळात व खर्चाच्या दृष्टीने परिणामकारक पध्दतीने करता याव्यात यासाठी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केला जातो व विपरित परिणामांचे मूल्यांकन नियोजनाच्या टप्पयातच करणे हे पर्यावरण आघात मुल्यांकन अभ्यासाचे मुख्य उद्यीष्ट आहे. जनतेची अनुकूलता सामाजिक तसेच पर्यावरणीय संरक्षणाच्या विकास कृती साठींच्या प्रभावी उपाययोजना जाणून घेणे हे जाहीर लोकसूनावणीचे उद्यीष्ट आहे.

त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाच्या माहिती विषयी विषद केले आणि सांगितले की सदर प्रकल्प हा ३० किलो लि. प्र.दि. ते ६० किलो लि.प्र.दि. मळीवर आधारित आसवणी चे विस्तारीकरण आहे. विद्यमान प्रकल्प हा २५०० टीसीडी गाळप क्षमतेचे साखर युनिट, १८ एमडब्ल्यू चा सहविज प्रकल्प आणि ३० किलो

लि प्र.दि. क्षमतेचा मळीवर आधारित आसवणी प्रकल्पा अशा प्रकारे आहे. कारखान्याने साखर युनिटच्या विस्तारीकरणासाठी १५ एप्रिल १९९३ रोजी महाराष्ट्र शासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले आहे, आसवणी प्रकल्पासाठी ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले आहे. कारखान्याने ३० किलोलि प्र.दि. क्षमतेचा आसवणी प्रकल्प हा स्तिर जैव (बायेस्टिल) किण्वन आणि उर्ध्वपतन या तंत्रज्ञानावर आधारित स्थापन केलेला आहे आणि ३० किलो लि प्र.दि. ते ६० किलोलि प्र.दि. हा आसवणीचा विस्तारीकरण प्रकल्प प्रस्तावित आहे. त्यांनी सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने जारी केलेल्या इआयए अधिसुचनेनूसार प्रस्तावित प्रकल्प हो ५ (g) वर्गात मोडतो त्यासाठी भारत सरकारच पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची पर्यावरणविषयक मंजूरी घेणे आवश्यक आहे आणि त्या अनुषंगाने कारखान्याने पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या इएसी कडे दि. १२ मे २०१८ रोजी टीओआर (TOR) प्राप्ता झाले व त्यानूसार पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यात आला. त्यांनी प्रकल्प स्थळ, अभ्यास क्षेत्र , प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. त्रिज्येच्या क्षेत्रातील अभ्यास क्षेत्र, गूगल नकाशा, विद्यमान कारखाना, वृक्षारोपण, इ. चे छायाचित्रे दाखविले आणि सांगितले की सदर प्रकल्पाचे स्थळ हे अंकूशनगर, ता. अंबड, जि. जालना येथे स्थित आहे व टोवाशीट क्र. हो ४७ M/११ प ४७ M/१५ असा आहे. त्यांनी कारखान्याच्या एकूण ३५८ एकर क्षेत्राचा आराखडा दाखविला आणि सांगितले की प्रस्तावित आसवणी प्रकल्प हा विद्यमाना आसवणी प्रकल्पस्थळीचे ५.५ एकर क्षेत्रावर स्थापित करण्यात येईल.

त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे विषद केली आणि सांगितले की विद्यमान साखर कारखाना हा २५०० टसीडी गाळप क्षमतेचा आहे व सहविज प्रकल्प हा १८ एमडब्ल्यू क्षमतेचा आहे आणि हे दोन्ही प्रकल्प वर्षातून १८० दिवस चालतात. विद्यमान असवणी प्रकल्प हा ३० किलोलि प्र.दि. क्षमतेचा आहे तो १९० दिवस चालतो आणि विस्तारी करणानंतर आसवणी प्रकल्पाची क्षमता ही ६० किलोलि प्र.दि. अशी होईल. आसवणी साठी लागणारा कच्चा माल हा मळी असेल एकूण मळीची आवश्यकता ही ६९२३१ मे.टन प्रति वर्ष असेल त्यापैकी ४८७८२ मे.टन मळी ही स्वत:च्या स्तरावर कारखान्यातून घेतली जाईल व उर्वरित २०४४९ मे.टन मळी ही जवळपासच्या साखर कारखान्यातून घेतली जाईल. आसवणी प्रकल्पामधून उत्पादन होणारी उत्पादने आस एस, इएनए, फयुजन ऑईल, इंधन अल्कोहोल, शुध्द/अशुध्द अल्कोहोल, अल्कोहोल मिश्रीत ऑईल इ. असेल आसवणीसाठी प्रस्तावित केलेला बॉयलर हा २२ टपीएच क्षमतेचा असेल प्रस्तावित आसवणी प्रकल्प हो शुन्य द्रव नि:सारण/झीरो लिक्वीड डिस्चार्ज (ZLD) प्रणाली वर आधारित असेल आणि कूठलाही द्रव कारखाना परिसराच्या बाहेर सोडला जाणार नाही, आसवणीतून निर्माण होणारा स्पेन्ट वॉश बगॅस आणि कोळशा बरोबर सदर बॉयलरसाठी इंधन म्हणून वापलरा जाईल. सदर प्रकल्पासाठी लागणा-या पाण्याचे स्त्रोत हे गोदावरी नदी आहे त्यासाठी कारखान्याने आवश्यक ती परवानगी घेतलेली आहे व एकूण पाण्याची आवश्यकता ६१२ घ.मी.प्र.दि. असेल. निर्माण होण-या ओद्यागिक सांडपाण्यावर एमइई मध्ये प्रक्रिया केली जाईल त्यामागे सीपीयु मध्ये प्रक्रिया केल्यानंतर कंडेन्सेट पून्हा प्रिक्रियेमध्ये वापरले जाईल. बॉयलर मधून उत्सार्जित होणारे वायू प्रदूषण नियंत्रित करण्यसाठी ६० मि. उंचिची चिमणी व इएसपी प्रस्तावित केलेले आहे.

त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाच्या मुलभूत गरजांविषयी विषद केले आणि आधि सांगितल्याप्रमाणे कारखान्याची एकूण ३५८ एकर जमिन आहे त्यापैकी ५.५ एकर जमिन प्रस्तावित आसवणी प्रकल्पासाठी

वापरण्यात येईल व अतिरीक्त जमिनीची आवश्यकता भासनार नाही, लागणारा कच्चा माल त्यांच्या विद्यमान साखर कारखाना तसेच जवळपासच्या साखर कारखन्यापासून उपलद्व करण्यात येई, विस्तारीकरणानंतर दैनंदिन मळीची आवश्यकता ही २३०.७७ मे.टन एवढी असेल, एकूण पाण्याची आवश्यकता ही ६१२ घ.मि.प्र.दि. एवढी असेल, वाफ आणि विजही २२ टीपीएच क्षमतेच्या बॉयलरमधून उपलद्व केल्या जाईल, प्रस्तावित आसवणी प्रकल्पासाठी एकूण आवश्यक असलेल्या एकूण मणूष्यबळ हे ९८ असेल, त्यापैकी ५७ कुशल कामगार व ४१ अकुशल कामगार असतील आणि साधारणत: ८० ते ८५% स्थानिक लोकांना रोजगार उपलद्व करुन देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

श्री. येवले यांनी पर्यावरणविषयक अभ्यासाविषयी विषद केले आणि सांगितले की वेगवेगळे घटक जसे वायू गुणवत्ता, जल गुणवत्ता, ध्वनी स्तार, जैव विविधता, जमिनीचे वर्गिकरण व सामाजिक – आर्थिक पर्यावरण इ. जाणून घेण्यासाठी त्यांनी टी.ओ.आर.(TOR) प्रमाणे मार्च, २०१९ ते मे, २०१९ या काळामध्ये तपशीलवार पर्यावरण विषयक अभ्यास केला. त्यांनी सदर प्रकल्प क्षेत्रातील १० कि.मी. त्रिज्येच्या क्षेत्रातील माहिती सांगितली जसे अक्षांस, रेखांश, अभ्यास क्षेत्रातील एकूण गावांची संख्या-२३, जवळचे निवासस्थान-महाकाळा, जवळची नदी-गोदावरी, जवळची आयएमडी वेधशाळा-औरंगाबाद, जवळचे शहर-औरंगाबाद, जवळची रेल्वे लाईन-कोडी, जवळचे विमानतळ-औरंगाबाद, जवळचा महामार्ग-राष्ट्रीय महामार्ग २११ व १० कि.मी. त्रिज्येच्या क्षेत्रात धार्मिक/ऐतिहासिक स्थाळ, पुरातत्व वास्तू व राखीव जंगल येत नाही आणि भूंकपाच्या अभ्यासानूसार सदर भाग हो झोन-३ मध्ये मोडतो.

त्यांनी सांगितले की सदर भागातील तापमान, सरासरी वा-याची दिशा, सापेक्ष आर्द्रता जाणून घेण्यासाठी अभ्यास केला. अभ्यास क्षेत्रामध्ये ८ वेगवेगळया ठिकाणी जसे प्रकल्प स्थळ, शहागड, पाथरवाला (बू), कुरण,चूर्मापूरी, साष्टपिंपळगाव, याथरवाला(खू) व महाकाळा येथे $PM_{10}$, $PM_{2.5}$, $SO_2$ आणि NOx या मापदंडासाठी हवा गूणवत्ता परीक्षण केले व हवेची गुणवत्ता जी आढळून आली ती अशी ४६.८१-८८.५१ ug/m3 जी केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्धारीत केलेल्या मानकाच्या आत आहे. त्यांनी सांगितले कि, भूजल गुणवत्तेसाठी विहीर, बोरवेल इ.आणि भूतलावरील पाण्याच्या गुणवत्तेसाठी गोदावरी नदी, पैठण कालवा अशा वेगवेगळ्या एकूण ९ ठिकाणचे पाण्याचे नमुने घेऊन अभ्यास केला आणि त्यात असे आढळून आले कि, भूतलावरील पाण्याची गुणवत्ता - ६.८९ ते ७.८९, टीडीएस - १०६.९८ - १३४.६७ मिलिग्रॅम/ली., एकूण जडत्व - ८९.८ ते ११४.८ मिलिग्रॅम/ली., क्लोराइडस - ३७.९९ - ४५.९९ मिलिग्रॅम/ली., सलफेट - २७.८२ - ३९.०८ मिलिग्रॅम/ली.. तसेच भूजलाच्या गुणवत्तेमध्ये सामू - ६.६७ - ७.५, एकूण जडत्व - १०३ - ५३६.५. मिलिग्रॅम/ली., मातीच्या गुणवत्तेसाठीच्या अभ्यासासाठी प्रकल्प क्षेत्रातील शहागड, पाथरवाला (बु.), कुरण, नाळेवाडी, साष्टपिंपळगाव, पाथरवाला (खु.), व महाकाला अशा ८ वेगवेगळ्या ठिकाणचे मातीचे नमुने घेतले. त्यात असे आढळून आले, सामू - ७.०९ - ८.१६, पाणी धारण क्षमता - ३५.२ ते ४८.९ %. मातीचा प्रकार चिकन आहे व ती पिकांच्या आणि वनस्पतीच्या वाढीसाठी चांगली आहे. त्यांनी सांगितले कि, अभ्यास क्षेत्रात त्यांनी प्रकल्प स्थळ, औद्योगिक क्षेत्र, गावे - महाकाला, पाथरवाला, शहागड इ. एकूण ९ वेगवेगळ्या ठिकाणी ध्वनी पातळी परीक्षण केले आणि असे आढळून आले कि, अभ्यास क्षेत्रातील ध्वनी पातळी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्धारित केलेल्या मानकांच्या आत आहे.

त्यांनी जैव पर्यावरणाविषयी सांगितले कि, त्यांनी प्रकल्प क्षेत्रातील १० किमी. त्रिज्या क्षेत्रात अभ्यास केला असता त्यांना असे दिसून आले कि, या क्षेत्रात वनस्पती व झुडपांच्या ८५ प्रजाती आहेत, त्यात प्रामुख्याने वड, निम, चिंच इ, आहेत. तसेच पक्षांच्या वेगवेगळ्या ५९ प्रजाती आणि सरपटणारे प्राणी आढळून आले. वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या अ.क्र. १ च्या यादीमधील कोणत्याही प्रजाती अभ्यास क्षेत्रात आढळून आल्या नाहीत. प्रकल्प क्षेत्रात हरितपट्टा मूळ प्रजाती सह विकसित केलेला आहे. त्यांनी अभ्यास क्षेत्रातील जमिनीच्या वर्गीकरणाचे छायाचित्र दाखविले. त्यामध्ये शेतजमीन, नापीक जमीन, पडीक जमीन, मोकळी जागा, वनस्पती, जलाशय इ. चा समावेश केलेला दिसून आला. त्यांनी सादर भागातील सामाजिक, आर्थिक, पर्यावरणाविषयीची स्थिती सांगितली. अभ्यास क्षेत्रात एकूण २३ गावांचा समावेश होतो. २०११ च्या जनगणनेनुसार तेथील लोकसंख्या ४३९४० एवढी आहे. त्यापैकी ५१.१० % पुरुष व ४८.८९ % स्त्रिया आहेत. आणि एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अनुक्रमे १२.८६% व २.६१% असे आहे. सदर भागात शेती हा मुख्य व्यवसाय आहे, तसेच शेतीवर आधारित अन्य उद्योगधंदे आहेत. श्री येवले यांनी प्रस्तावित प्रकल्पामुळे सभोवतालच्या पर्यावरणावर होणाऱ्या अपेक्षित प्रभावाविषयी असे सांगितले कि, असा प्रभाव बांधकाम तसेच परिचलन टप्प्यादरम्यान अपेक्षित आहे.

**बांधकाम टप्पा** : प्रस्तावित प्रकल्प हा नियोजित कारखाना जागेत स्थापित केला जाईल. खोरकामातून निघणारी माती हरितपट्टा विकसित करण्यासाठी वापरण्यात येईल. जड वाहनांच्या वर्दळीमुळे निर्माण होणारी धूळ कमी करण्यासाठी कारखाना परिसरात पाण्याची फवारणी केली जाईल आणि वेळोवेळी वाहनांची तपासणी केली जाईल. ध्वनी प्रदूषण कमी करण्यासाठी प्रकल्पाभोवती भिंतीचे कुंपण तयार केले जाईल. बांधकामासाठी मर्यादित पाण्याचा वापर केला जाईल. बांधकाम दरम्यान निघणाऱ्या कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात येईल. कामगारांना पर्यावरणाचे महत्व सांगितले जाईल व वेळोवेळी आवश्यक असे प्रशिक्षण दिले जाईल आणि कामगारांचे आरोग्य तपासले जाईल.

**परिचलन टप्पा** : प्रस्तावित प्रकल्पामुळे सदर भागातील हवा, पाणी, ध्वनी, घनकचरा यावर प्रभाव अपेक्षित आहे. वनस्पती आणि प्राण्यावर नगण्य असा प्रभाव होईल. जमिनीवर काही प्रभाव होणार नाही. सभोवतालच्या परिसरातील जनजीवनावर अगदी नगण्य प्रभाव होईल. जमीन, भूतलावरील पाणी व भूगर्भातील पाणी यावर सांडपाण्याचा काहीही परिणाम होणार नाही. कारण प्रातवित प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज या प्रणालीवर आधारित आहे.

प्रकल्पातील हवा, पाणी घनकचरा व ध्वनी यासाठी तयार केलेली पर्यावरण व्यवस्थापन योजने बद्दल त्यांनी खालीलप्रमाणे सांगितले ..

**हवा** : बॉयलर, वाहनांची वर्दळ, राख हाताळणी विभाग हे वायू प्रदूषणाचे संभाव्य स्त्रोत आहेत. वायू प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी ९५ टीपीएच क्षमतेच्या विद्यमान बॉयलर साठी ७६ मी.उंचीची चिमणी व स्क्रबर बसविलेले आहे. तसेच २२ टीपीएच क्षमतेच्या प्रस्तावित बॉयलर साठी 60 मी. उंचीची चिमणी व इ.एस.पी. बसविण्यात येईल. कारखाना परिसरातील रस्ते स्वच्छ ठेवल्या जातील. गरज भासल्यास धुळीचे उत्सर्जन कमी करण्यासाठी रस्त्यावर पाण्याची फवारणी केली जाईल. कारखाना परिसरातील हवा शुद्ध करण्यासाठी हरित पट्ट्याची मदत होईल आणि विद्यमान हवा प्रदूषण नियंत्रण प्रणाली वायू प्रदूषण कमी करण्यास मदत करेल.

**पाणी** : पाण्याचा वापर कमीत कमी व्हावा यासाठी सतत प्रयत्न केला जाईल, व पुरचक्रामुळे सांडपाण्याची निर्मिती कमी होईल. सांडपाणी प्रवाह मोजण्यासाठी प्रवाह मीटर बसविण्यात येईल. पाण्याचा वापर आणखी कमी करण्यासाठी पाण्याचे ऑडिट केले जाईल. प्रक्रियेमधून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पुन्हा प्रक्रियेमध्ये वापरले जाईल. एम.ई.ई. मधून निघणारे कंडेन्सटें परत कंडेन्सटें पॉलिशिंग युनिट (CPU) मध्ये प्रक्रिया करून त्याचा कूलिंग टॉवरसाठी पुन्हा वापर करण्यात येईल.

**सांडपाणी आणि घनकचरा** : आधी सांगितल्याप्रमाणे आसवनी प्रकल्पामध्ये एम.ई.ई.मधून निघणाऱ्या कंडेन्सटें वर कंडेन्सटें पॉलिशिंग युनिट (CPU) मध्ये प्रक्रिया केली जाईल व प्रक्रियेनंतर त्याचा कूलिंग टॉवरसाठी पुन्हा वापर करण्यात येईल. ईटीपी स्लज चे प्रेस मड मध्ये मिश्रण केले जाईल व नंतर ते हरित पट्टा संवर्धनासाठी खत म्हणून वापरले जाईल. आसवनी प्रकल्पामधून निघणारा स्पेंट वॉश एम ई ई ला पाठविला जाईल व बाष्पीभवनानंतर कॉन्सन्ट्रेट स्पेंट वॉश बगॅस सोबत बॉयलर मध्ये इंधन म्हणून वापरला जाईल.

**हरित पट्टा** : त्यांनी सांगितले कि, कारखान्याने ५० एकर जमिनीवर हरित पट्टा विकसित केलेला आहे. सदर हरित पट्टा हा पर्यावरण, वने व हवामानातील बदल मंत्रालयाच्या तज्ज्ञ समितीच्या मार्गदर्शक तत्वानुसार ३३% आहे. त्यांनी सदर हरित पट्ट्याची छायाचित्र दाखवली.

**व्यावसायिक/कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR)** : त्यांनी सांगितले कि, कारखान्याने CSR अंतर्गत विविध कार्यक्रम हाती घेऊन राबविली जात आहेत. जसे सभासद अपघात विमा योजना, अन्य विकास योजने अंतर्गत विविध योजना कर्मयोगी अंकुशराव टोपे सर्वाधिक ऊस उत्पादक गौरव पुरस्कार, माती परीक्षण सुविधा, ठिबक सिंचन योजना, कंपोस्ट खत प्रकल्प, गांडूळ खत प्रकल्प, शेतकरी प्रशिक्षण चर्चा सत्र, वृक्षारोपण व संवर्धन / जतन, आरोग्य सुविधा, वैद्यकीय मदत, महिलांसाठी मोफत सर्व रोग निदान शिबीर, मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आणि रोजगार शिबीर इ.

पर्यावरण व्यवस्थापन योजनेवर करण्यात येणाऱ्या एकूण खर्चाबाबत त्यांनी सांगितले कि, यासाठी आसवानी प्रकल्पाची एकूण भांडवली किंमत साधारणतः रु.७८.०० कोटी आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी विविध पैलूंसाठी देखील भांडवली तरतूद केलेली आहे. जसे वायू प्रदूषण नियंत्रणासाठी रु. ४.०० कोटी, पाणी आणि सांडपाणी व्यवस्थापनासाठी - रु. २.०० कोटी, घनकचरा व्यवस्थापनासाठी - रु. २०.०० लाख, वनीकरणासाठी - रु. २०.०० लाख, पर्यावरण देखरेख, रेन वॉटर हार्वेस्टिंग, सुरक्षा इ. साठी एकूण रु. ६.९५ कोटी भांडवली खर्चाची तरतूद केलेली आहे. त्यांनी सांगितले कि, पर्यावरण, वने व हवामानातील बदल मंत्रालयाने एप्रिल २०१६ मध्ये जरी केलेल्या अधिसूचनेनुसार कारखान्याने कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी अंतर्गत CER रु. ७८.०० लाख ची तरतूद केलेली आहे, तसेच या अंतर्गत जालना, अंबड, घनसावंगी या तालुक्यात विविध कार्यक्रम हाती घेण्यात येतील आणि सदर रक्कम तीन वर्षाच्या काळात खर्च करण्यात येईल. या नंतर त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण समाप्त केले.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे सादरीकरण समाप्त केल्यानंतर डॉ. योगिनी बालंखे यांनी सार्वजनिक सहभागींना विनंती केली कि, सदर प्रकल्पासंबंधी जर कुणाला काही प्रश्न, सूचना, आक्षेप असतील तर ते त्यांनी त्यांचे नाव व गावाचे नाव सांगून विचारावेत. आणि प्रकल्प प्रवर्तकाने त्याचे समाधानकारक उत्तर द्यावे.

जाहीर लोकसुनावणी दरम्यान सार्वजनिक सहभागींनी सदर प्रकल्पासंबंधित काही प्रश्न उपस्थित केले आणि प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार यांनी त्याची उत्तरे दिली. ते खालील प्रमाणे आहेत.

१) **श्री बयाजी एकनाथ जायभाय, महाकाला, ता. अंबड, जि. जालना** येथील रहिवाशी यांनी सदर प्रकल्पाची एकूण किंमत व त्यात कारखान्याचे योगदान हिस्सा या विषयी विचारले. प्रकल्प सल्लागार श्री येवले यांनी सांगितले कि, सदर प्रकल्पाची एकूण किंमत रु. ७८.०० कोटी आहे. सदर प्रकल्पाचे कार्यकारी संचालक श्री बाजीराव तुकाराम पावसे यांनी सांगितले कि, प्रकल्प किंमती मध्ये कारखान्याचा हिस्सा - १० % , शेतकऱ्याचा - ४० % व कर्ज - ५० % असेल.

२) **श्री .... राहणार महाकाला, ता. अंबड, जि. जालना येथील माजी सरपंच** यांनी आसवनी प्रकल्पाला लागणारे पाणी व सांडपाण्याच्या विल्हेवाटी विषयी विचारले, त्यावर श्री येवले यांनी सांगितले कि, आसवनी प्रकल्पाला लागणारे पाणी ६१२ घ.मी. प्र. दिन असेल व त्याचे स्रोत गोदावरी नदी असून त्यासाठी आवश्यक ती परवानगी मिळालेली आहे.

त्यांनी पुढे सांगितले कि, आसवनी प्रकल्पामध्ये आणि एम.ओ.इ.एफ./सी.पी.सी.बी. यांच्या झिरो लिक्विड डिस्चार्ज करिता असलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार स्पेंट वॉश एम ई ई मध्ये प्रक्रियाकृत केले जाईल आणि बाष्पीभवन व कॉन्सन्ट्रेशन नंतर कंडेन्सटें वर  मध्ये प्रक्रिया करून त्याचा प्रक्रियेमध्ये पुनर्वापर करण्यात येईल आणि उर्वरित कॉन्सन्ट्रेट व स्पेंट वॉश बॉयलर साठी इंधन म्हणून वापरला जाईल. आणि म्हणून कोणत्याही प्रकारचे सांडपाणी कारखाना परिसराच्या बाहेर सोडल्या जाणार नाही. श्री पावसे यांनी सांगितले कि, उसामध्ये साधारणतः ७० % पाणी असते, त्यापैकी साधारणतः ५० % पाणी ज्याला कंडेन्सटें म्हणतात ते विद्यमान आसवनी  प्रकल्पामध्ये वापरले जाते आणि प्रस्तावित प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ऊस प्रयेमध्ये साखर कारखान्यातून निघणारे १००% पाणी वापरले जाईल. त्यामुळे २२ टी.पी.एच क्षमतेच्या प्रस्तावित बॉयलरला फक्त २ - ३ घ.मी.प्र.दि. ताजे पाणी लागेल.

३) **श्री विनायक मुरलीधर मचे, जवळचे गाव शहागड, ता. अंबड, जि, जालना** येथील रहिवाशी यांनी सदर प्रकल्पातून निघणाऱ्या सांडपाण्याच्या विल्हेवाटी विषयी व ते शेतकऱ्यांना शेतीसाठी उपयुक्त आहे किंवा कसे असे विचारले. यावर श्री पावसे यांनी सांगितले कि, झिरो लिक्विड डिस्चार्ज साध्य करण्यासाठी आसवनी प्रकल्पातून निर्माण होणार स्पेंट वॉश हा एम.ई.ई. मधून कॉन्सन्ट्रेट केला जाईल व बाष्पीभवनानंतर तो २२ टी.पी.एच क्षमतेच्या प्रस्तावित डिस्टिलेशन बॉयलर मध्ये जाळला जाईल. त्यामुळे कोणतेही सांडपाणी निर्माण होणार नाही.

४) **श्री ... ग्रामपंचायत सदस्य, वाळकेश्वर, ता. अंबड, जि. जालना** यांनी सदर प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना मिळणारे फायदे व त्याचे स्वरूप या बाबत माहिती देण्याविषयी विचारले. श्री पावसे यांनी सांगितले कि, प्रत्येकजण दररोजच्या जीवनात पेट्रोल वापरतो आणि पेट्रोल/डिझेल हे अरब देशाकडून आयात केले जाते. त्याच्या मोबदल्यात सरकार अमेरिकन डॉलरच्या स्वरूपात करोडो रुपयांचा कर भरत असतो. त्यामुळे केंद्र सरकारवर बोजा पडतो आणि म्हणून केंद्र सरकारने पेट्रोल मध्ये १०% इथेनॉल वापरण्याची परवानगी दिलेली आहे. त्यांनी निदर्शनास आणून दिले कि, जगामध्ये ब्राझील हा एक देश आहे कि, जेथे वर्षाला ४०० ते ५०० मे.टन साखरेचे उत्पादन केले जाते व जेवढी आवश्यकता आहे तेवढीच साखरेचे उत्पादन घेण्यासाठी व्यवस्था केली आहे. तसेच जास्तीत जास्त इथेनॉल चे उत्पादन केले जाते व ते पेट्रोल मध्ये मिश्रित केले जाते आणि वाहनामध्ये वापरण्यात येते. म्हणून त्यांनी सांगितले कि, प्रस्तावित

प्रकल्पामधून उत्पादित होणारे इथेनॉल हे पेट्रोल मध्ये मिश्रित केले जाईल व त्याच्या माध्यमातून कारखान्याला पैसे मिळतील आणि त्यातून शेतकऱ्यांना उसाच्या दराच्या माध्यमातून अथवा अन्य बाबीच्या माध्यमातून फायदा मिळेल.

५) **श्री शेख रफिक शेख, महाकाल, ता. अंबड, जि, जालना** येथील रहिवाशी यांनी सदर प्रकल्पामध्ये विकसित करण्यात येणाऱ्या हरित पट्ट्याविषयी विचारले, त्यावर श्री येवले यांनी सांगितले कि, कारखान्याकडे त्यांच्या स्वतःच्या मालकीची ३५८ एकर एवढी जागा आहे व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वानुसार हरित पट्टा विकासासाठी ३३% जागा अपेक्षित आहे आणि त्यानुसार कारखान्याकडे ५० एकर जमिनीवर हरित पट्टा अस्तित्वात आहे जो केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वानुसार आहे व कारखाना दरवर्षी झाडे लावत असते.

६) **श्री मुक्ताराम रघुनाथ ढवळे, महाकाल, ता. अंबड, जि, जालना** येथील रहिवाशी यांनी सदर प्रकल्पत नोकरीस लागणाऱ्या कामगारावर काही परिणाम होईल का आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यात येईल का असे विचारे. यावर श्री पावसे यांनी सांगितले कि, प्रस्तावित प्रकल्पापासून झिरो प्रदूषण असेल, त्यामुळे जमीन, मानव तसेच प्राण्यावर कोणताही परिणाम होणार नाही.

७) **श्री ... शहागड, ता. अंबड, जि. जालना येथील** रहिवाशी यांनी प्रस्तावित प्रकल्पामुळे सुशिक्षित व बेरोजगारांना काही फायदा होईल काय असे विचारले. त्यावर श्री पावसे यांनी सांगितले कि, सादर प्रकल्पासाठी कुशल व अकुशल कामगार लागतील आणि सुशिक्षित बेरोजगारांना सदर प्रकल्पामध्ये संधी दिली जाईल, त्याचा त्यांना फायदा होईल.

८) **श्री बाप्यासाहेब सोनाजी संपते, जवळचे गाव पाथरवाला(बु.) ता. अंबड,** जी. जालना यथील रहिवाशी यांनी सदर प्रकल्पामुळे कारखाना तसेच शेतकऱ्यांना वार्षिक आर्थिक फायद्याविषयी विचारले. यावर श्री पावसे यांनी सांगितले कि, प्रस्तावित ३० KLPD क्षमतेच्या आसवनी प्रकल्पामधून वर्षाला ९० लाख लिटर किंवा जास्तीत जास्त १८० लाख लिटर इथेनॉलची उत्पादन होईल आणि कारखान्याला इथेनॉलचा जो काही फायदा मिळेल तो शेतकऱ्यांना त्यांच्या उसाच्या भावाच्या स्वरूपात किंवा अन्य माध्यमाच्या स्वरूपात करून दिला जाईल.

९) **श्री शहादेव गेनाजी ता. अंबड, जि.** जालना येथील रहिवाशी यांनी वायू प्रदूषण होऊ नये म्हणून करण्यात येणाऱ्या उपाय योजना विषयी विचारले. यावर श्री येवले यांनी सांगितले कि, २२ टी.पी.एच. क्षमतेच्या प्रस्तावित बॉईलरमध्ये कॉन्सन्ट्रेटेड स्पेंट वॉश चा इंधन म्हणून वापर केला जाईल आणि ९९.९ % कार्यक्षमता असलेली हि वायू प्रदूषण नियंत्रण प्रणाली बसविण्यात येईल. त्यामुळे सदर प्रकल्पामुळे कोणतेही वायू प्रदूषण होणार नाही.

१०) **श्री योगेश्वर विश्वनाथ जरे, जवळचे गाव गुरुनाथनगर, महाकाल, ता. अंबड, जि, जालना** येथील रहिवाशी सदर प्रकल्पामुळे सभोवतालच्या जीवितास काही फायदा किंवा नुकसान होईल काय असे विचारले. यावर श्री येवले यांनी सांगितले कि, प्रस्तावित प्रकल्प झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रणालीवर आधारित आहे आणि जे काही सांडपाणी निर्माण होईल ते प्रक्रिया केल्यानंतर पूर्णपणे प्रक्रियेमध्ये वापरले जाईल. त्यामुळे कोणते हि सांडपाणी जमिनीवर किंवा जलाशयात सोडले जाणार नाही. पाण्याचा कमीत

कमी वापर केला जाईल आणि सदर प्रकल्पाच्या लगतच्या जमिनीवर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

डॉ. योगिनी बाळंखे यांनी सार्वजनिक सहभागींचे आभार मानले आणि प्रस्तावित प्रकल्पाविषयी सार्वजनिक सहभागींनी विचारण्यात येणारे प्रश्न शिल्लक नाहीत असे निदर्शनास आल्यानंतर श्रीमती दीपाली मोतीयेले, अतिरिक्त जिल्हाधिकारी, जालना तथा लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षा यांनी सदर लोकसुनावणीचे समापन केले.

शेवटी अध्यक्षाचे आभार मानून जाहीर लोकसुनावणी संपन्न झाली.

(डॉ.राजेंद्र राजपूत)
सदस्य

(दीपाली मोतीयेळे)
अध्यक्षा

(डॉ. योगिनी बाळंखे)
समन्वयक